**CNR-MHDH05-001024-2017**

## निशाणी क्र. ५७ वर आदेश

प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादी यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

अर्ज :

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी आजचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, सदर दाव्यातील लेखी कैफियतमध्ये दुरूस्ती अर्ज, दाखल करावयाचा आहे. सबब आजचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

खुलासा :

३. प्रस्तुतच्या अर्जावार वादी यांच्यातर्फे हरकत घेण्यात आली. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस प्रतिवादी यांना कोणतेही सबळ कारण घडलेले नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहेत. दावा हा पाच वर्षांपासून प्रलंबीत आहे. प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादीतर्फे उलट तपासाचे कामकाज देखील गेल्या तारखेस सुरू होऊन प्रतिवादीतर्फे उलट तपास सुरू करण्यात आला असतांना, प्रतिवादींनी मुदतीची विनंती केली

व आज रोजी उलट तपासाचे कामकाज करणे ऐवजी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. वादी (साक्षीदार वयोवृध्द) असून लांब पल्ल्यावरुन न्यायालयात प्रत्येक तारखेस न चुकता हजर असतात. प्रस्तुत अर्ज देण्याचा प्रतिवादींचा उद्देश शुध्द नाही. प्रतिवादींनी मोघम कथनाचा अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात येऊन प्रतिवादींना हेवी कॉष्ट करण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली.

५. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा घोषित होऊन मिळणेसाठी, वाटणीसाठी व निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केलेली आहे. त्यानंतर माझे सन्मानीय पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. ३४ अन्वये दिनांक १८.०३.२०२१ रोजी वादमुद्दे निश्चित केले. वादी यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ३५ अन्वये अभिलेखावर दाखल आहे.

६. वादी यांचा अधिकचा सरतपास हा दिनांक ०१.०४.२०२२ रोजी पुर्ण झालेला आहे. प्रतिवादी यांचे तोंडी विनंती अन्वये त्या दिवशी प्रकरण हे तहकूब करण्यात आले होते. त्यानंतन प्रतिवादी यांचेतर्फे नि.क्र. ५३ अन्वये मुदतीचा अर्ज दाखल करण्यात आला. न्यायालयाने सदरचा अर्ज हा रुपये २००/– च्या शास्तीवर मंजुर केला. त्यानंतर प्रकरण हे तहकूब करण्यात आले होते. प्रतिवादी यांनी पुन्हा नि.क्र. ५४ अन्वये मुदतीचा अर्ज दाखल केला. न्यायालयाने सदरचा अर्ज देखील रुपये ५००/– च्या शास्तीवर मंजुर केला होता.

त्यानंतर नि.क्र. ५५ अन्वये प्रतिवादी यांनी पुन्हा मुदतीसाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने सदरचा अर्ज हा विधिज्ञ आजारी असल्याने निर्देशासह मंजुर केला होता. त्यानंतर प्रकरण हे वेळोवेळी तहकूब करण्यात आले. प्रतिवादी यांचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन दिनांक ०३.१२.२०२२ आणि १७.१२.२०२२ रोजी प्रकरण तहकूब करण्यात आले.

७. त्यानंतर दिनांक १६.०१.२०२३ रोजी प्रतिवादी यांनी वादी यांचे साक्षीदाराचा उलट तपास घेतला. परंतु प्रतिवादी यांचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन तो तहकूब करण्यात आला. प्रतिवादी यांनी आजरोजी पुन्हा प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. त्यांना कैफियतमध्ये दुरूस्ती करावयाची आहे, असे अर्जात नमुद आहे. परंतु प्रकरण हे त्यांचे उलट तपासणीवर आहे, याची माहिती व जाणीव ही प्रतिवादी यांना आहे. कारण त्यांनी वेळोवेळी अर्ज दाखल केली आहे तसेच तोंडी विनंती देखील केली आहे.

८. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

९. दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश १७ हे तहकुबी बाबतचे आहे. यामध्ये तीन

वेळेस तहकुब करावे, या आशयाचा मानद आहे, प्रकरण हे सन २०१७ चे आहे. प्रतिवादी यांना कैफियतमध्ये दुरूस्ती करावयाची आहे, हे कारण सबळ नाही. परंतु, फक्त संधी मिळावी या दृष्टीने व न्यायशास्त्राचे तत्व Principle of natural Justice, या अन्वये शेवटची संधी म्हणून अर्ज मंजुर करावासा वाटतो, प्रतिवादी यांना प्रकरणाची स्थिती बद्दल माहिती आहे. त्यामुळे काही शास्ती लादावी असे मला वाटते. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

- प्रतिवादी यांचा अर्ज रक्कम रुपये ५,०००/-(अक्षरी रुपये पाच हजार मात्र) कॉस्ट (शास्तीवर) मंजुर करण्यात येतो. सदरची शास्ती ही वादीस अदा करावी.
- प्रतिवादी यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेस योगय ती कार्यवाही करावी अन्यथा त्यांचा उलट तपास हा बंद करण्यात येईल.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2023.02.01 17:32:07 +0530

**( रा.भा.डोळे )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

साक्री
दिनांक : ०१.०२.२०२३.

**: <u>प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – ०१.०२.२०२३.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३